# 'विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी मदत 'बेस्ट प्रॅक्टिस'

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : निवृत्त शिक्षकाच्या शिष्यवृत्तीचे विद्यापीठात वितरण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी त्यांना आवश्यक ती मदत करणे, ही शिवाजी विद्यापीठाची 'बेस्ट प्रॅक्टिस' ठरावी, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी येथे व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान अधिविभागातील सौरभ संजय पाटील, शिवानी हणमंत गायकवाड या पात्र विद्यार्थ्यांना 'निवृत्त शिक्षकांची शिष्यवृत्ती सन २०२०-२०२१'चे वितरण केल्यानंतर ते बोलत होते.



कोल्हापूर : विद्यापीठात 'निवृत्त शिक्षकाच्या शिष्यवृत्ती'च्या वितरणप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासमवेत सौरभ पाटील व शिवानी गायकवाड. सोबत डावीकडून डॉ. एन. एल. तरवाळ, आर. वाय. लिधड आदी.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आणि अधिविभागप्रमुख डॉ. के. वाय. राजपुरे यांनी प्रा. खासबारदार यांच्या अध्यापन कौशल्याचा वेध घेतला. डॉ. एन. एल. तरवाळ यांनी मनोगत व्यक्त केले, तर शिष्यवृत्तीप्राप्त विद्यार्थी सौरभ पाटील व शिवानी गायकवाड यांनी कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते दोन्ही विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, पदार्थविज्ञान अधिविभागात सन १९६५ ते १९९९ इतके प्रदीर्घ काळ अध्यापन व संशोधनाचे कार्य केल्यानंतर निवृत्त झालेल्या प्रा. बी. व्ही. खासबारदार यांच्यासारख्या समर्पित वृत्तीच्या शिक्षकाने पदार्थविज्ञान अधिविभागात 'कमवा व शिका' योजनेतून अभ्यास करून त्याअंतर्गत उत्तम शैक्षणिक कामगिरी बजावून एम.एस्सी. भाग-२ मध्ये प्रविष्ट झालेल्या पहिल्या दोन विद्यार्थ्यांना 'निवृत्त शिक्षकाची शिष्यवृत्ती' देण्यासाठी विद्यापीठाकडे काही निधी दिला. त्यातून सदर शिष्यवृत्ती दरवर्षी प्रदान करण्यात येते.

यावेळी पदव्युत्तर प्रवेश विभागाच्या उपकुलसचिव बी. एम. नाळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी आर. वाय. लिधडे, सहायक कुलसचिव डी. डी. सावगावे आदी उपस्थित होते.

0 9 SEP 2021 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विकासात महिलांना सामावून घेणे गरजेचे

## अर्थशास्त्र विभागाच्या ऑनलाईन व्याख्यानमालेत आर. मुकुंदन यांचे प्रतिपादन

कोल्हापूर : प्रतिनिधी



देशाच्या सर्वांगीण सामाजिक-आर्थिक प्रगतीसाठी ५० टक्के लोकसंख्या असलेल्या महिलावर्गाला सर्वच क्षेत्रातील मुख्य प्रवाहात बरोबरीने सामावून घेण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन टाटा केमिकल्स कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी आर. मुकुंदन यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागातर्फे सुरू असलेल्या विशेष ऑनलाईन व्याख्यानमालेअंतर्गत अंतिम चौथे पुष्प गुंफताना ते बोलत होते. 'भारतातील संवर्धनीय शाश्वतता व डिजिटल संधींचे नवनिर्माण' या विषयावर ते बोलत होते.

मुकुंदन म्हणाले, २० वर्षांत भारताच्या सर्वांगीण वृद्धीमध्ये सक्रिय योगदान देण्याची संधी तरुणांना लाभणार आहे. येत्या दहा वर्षांतच आपल्या देशाच्या अर्थकारणाचा आवाका दुपटीने वाढणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, लिंगसमानता, समतोल सामाजिक-आर्थिक विकास, संवर्धनशीलता, नैसर्गिक संसाधनाचा पुनर्वापर, जैवविविधतेचे संरक्षण अशा सर्वंकष बाबींचा शैक्षणिक प्रक्रियेमध्ये सुरुवातीपासून समावेश करून सजग व जाणिवासमृद्ध भावी पिढी घडविण्याची आज मोठी गरज आहे. डॉ. ज्ञानदेव तळुले यांनी प्रास्ताविक केले. डॉ. यशवंतराव थोरात यांनी प्रमुख व्याख्यात्यांचा परिचय करून दिला. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

तरूण भारत

# सर्वच क्षेत्रात महिलांना समान दर्जा द्या

▪ टाटा केमिकलचे मुख्य कार्यकारी अधिकारी मुकुंदन यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर :** दहा वर्षांत आपल्या देशाच्या अर्थकारणाचा आवाका दुपटीने वाढणार आहे. भारताची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलरच्या घरात असेल. ही वृद्धी केवळ संख्यात्मक नसेल, तर दर्जात्मकही असेल. मात्र त्यासाठी शालेय शिक्षण, उच्चशिक्षणापासून ते सर्वंच क्षेत्रात महिलांना बरोबरीचा दर्जा प्रदान केला पाहिजे, असे प्रतिपादन टाटा केमिकल्स लि. कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी आर. मुकुंदन यांनी केले.



शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागाच्यावतीने आयोजित ऑनलाईन व्याख्यानमालेअंतर्गत ते बोलत होते. 'भारतातील संवर्धनीय शाश्वतता व डिजीटल संधींचे नवनिर्माण' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. यशवंतराव थोरात यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुकुंदन म्हणाले, शिक्षणाच्या प्रवाहात पुरूषांच्या तुलनेत महिलांची वाढती संख्या निश्चितच चांगली आहे. परंतु लिंगभेदविरहित समताधिष्ठित समाजव्यवस्थेमध्ये तिचे सामाजिक-आर्थिक समावेशन कशा पद्धतीने होते, यावर पुढील वाटचाल अवलंबून असेल. संवर्धनशील, शाश्वत विकास आणि डिजीटल तंत्रज्ञान या दोन बाबी सर्वच क्षेत्रांच्या प्रगतीसाठी महत्त्वाच्या आहेत. विकासाच्या प्रक्रियेमध्ये नैसर्गिक संसाधनांचा वापर विचारपूर्वक करण्याची गरज आहे. संवर्धनशील फिरती अर्थव्यवस्था अंगिकारली पाहिजे. अर्थात उत्पादनाचा वापर झाल्यानंतर त्यावर प्रक्रिया करून ते पुन्हा उत्पादन प्रक्रियेशी जोडले पाहिजे. जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धनाकडे कानाडोळा न करता त्यांची जबाबदारीही स्वीकारली पाहिजे. अर्थशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. ज्ञानदेव तळुले यांनी प्रास्ताविक केले. अर्थतज्ज्ञ डॉ. यशवंतराव थोरात यांनी व्याख्यात्यांचा परिचय करून दिला.

तरूण भारत

# अभियांत्रिकीचा निकाल दोन दिवसात जाहीर

प्रतिनिधी
कोल्हापूर

- शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सुरू असलेल्या ५३८ परीक्षांपैकी ७३ परीक्षांचा निकाल संकेतस्थळावर उपलब्ध

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सुरू असलेल्या ५३८ उन्हाळी ऑनलाईन परीक्षांपैकी आतापर्यंत ७३ परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत. तसेच अभियांत्रिकी अंतिम वर्षाचा निकाल परीक्षा झालेल्या दुसऱ्या दिवशी जाहीर झाल्याने ४५०० विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणाचा मार्ग रिकामा झाला आहे. अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे यांनी दिली.

विद्यापीठ अंतर्गत १० ऑगस्टपासून उन्हाळी परीक्षा सुरू झाल्या आहेत. या परीक्षांपैकी अभियांत्रिकी परीक्षेचा दोन दिवसात निकाल जाहीर केला आहे. तसेच ज्या त्या महाविद्यालयावर गुणपत्रक पोहचवण्याचे काम सुरू आहे. त्याचबरोबर विधी तीन व पाच वर्षाच्या अंतिम सेमिस्टचा निकाल जाहीर करून महाविद्यालयांना गुणपत्रक पाठवली आहेत. तसेच फार्मसीच्या अंतिम वर्षाचाही निकाल जाहीर झाला आहे. बहुतांश व्यवसायिक अभ्यासक्रमासह अन्य परीक्षांचेही निकाल लागले आहेत. त्यामुळे विद्यापीठाचे १ ऑक्टोबरपासून २०२१-२२ शैक्षणिक वर्ष सुरू होणार आहे. या शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रियेचाही मार्ग रिकामा झाला आहे.

09 SEP 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाने 'बी.ई.'सह १८ परीक्षांचा निकाल जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने १८ परीक्षांचे निकाल बुधवारी ऑनलाईन जाहीर केले. त्यात बी. ई.च्या अंतिम वर्षाच्या (सत्र सात आणि आठ) निकाल ही जाहीर केला आहे. या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका आज, गुरुवारी महाविद्यालयांना मिळणार आहेत.

> वेळेत गुणपत्रिका मिळाल्याने नोकरी आणि परदेशातील पुढील शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना चांगली मदत होणार आहे.
>
> **- गजानन पळसे**, प्रभारी संचालक, परीक्षा मंडळ.

परीक्षा मंडळाने एम. ए. फिलॉसॉफी, एम. एस्सी अ‍ॅनॅलिटीकल केमिस्ट्री, शुगर टेक्नॉलॉजी, इनऑरगॅनिक केमिस्ट्री (सत्र तीन, चार), बी. ए. ड्रेस मेकिंग अँड फॅशन कोऑर्डिनेशन (सत्र तीन, चार), बी. आर्किटेक्चर (सत्र आठ, दहा), बी. एस्सी. कॉम्प्युटर सायन्स (सत्र पाच, सहा), सर्टिफिकेट कोर्स इन फ्रेंच लँग्वेज (सत्र एक, दोन) परीक्षांचा निकाल ऑनलाईन जाहीर केले.

बी. ई. अभ्यासक्रमाची परीक्षा ऑगस्टअखेरीस झाली. त्यानंतर परीक्षा मंडळाला विद्यार्थ्यांचे गुण गेल्या दोन दिवसांपूर्वी प्राप्त झाले. त्यावर पुढील प्रक्रिया करून निकाल लावला.

बी. ए., बी. कॉम, बी. एस्सी. एम. ए., एम. कॉम., एम. एस्सी., बॅचलर ऑफ इंटेरिअर डिझायनिंग, ड्रेस मेकिंग अँड फॅशन कोऑर्डिनेश, बॅचलर ऑफ डिझायनिंग, मास्टर ऑफ व्हॅल्यूएशन, बी. एस्सी., एम. एस्सी (नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी), एम. ए., एम. एस्सी गणित, जिऑग्राफी, बी. टेक (सर्व शाखा), बीसीए., एमसीए., एमएडब्ल्यू., एमआरएस., एमपीए (म्युझिक)., एम. जे., बी. व्होक अभ्यासक्रमांची २८८९ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली.

पुढारी

# अभियांत्रिकी, विधी, फार्मसी अंतिम परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या अभियांत्रिकी, विधी, फार्मसी या अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आले. मार्च, एप्रिल २०२१ च्या परीक्षा १० ऑगस्टपासून सुरू झाल्या. एकूण ७३ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आले. बीई पदवी अंतिम वर्षाचे निकाल अवघ्या दोन दिवसांत घोषीत करण्यात आल्याचे विद्यापीठ प्रशासनाने कळवले आहे. या परीक्षांच्या गुणपत्रिका संबंधित महाविद्यालयांना पाठवण्यात आल्या आहेत. नोकरी किंवा परदेशात उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना या गुणपत्रिकेचा लाभ होणार आहे.